I J R S S I S, Issue (VIII), Vol. II, Jan 2023: 384-389
A Double-Blind Peer Reviewed Journal
OPEN ACCESS
e-ISSN 2347 – 517X
Original Article

INTERNATIONAL JOURNAL OF RESEARCHES IN SOCIAL SCIENCE AND INFORMATION STUDIES
© VMS RESEARCH FOUNDATION www.ijrssis.in

# विधवा स्त्रियांचे समाजातील स्थान व समस्या

संगीता श्रीकांत बढे व प्रज्ञा जुनघरे
सरदार पटेल महाविद्यालय, चंद्रपूर गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
गृहअर्थशास्त्र विभाग एफ.ई.एस.गर्ल्स कॉलेज, चंद्रपूर

Communicated : 02.01.2023 | Revision : 08.01.2023 Accepted : 15.01.2023 | Published: 27.01.2023

**सारांश :-**

भारतीय संस्कृतीमध्ये स्त्रिला नररत्नाची खाण म्हणून पुजल्या जाते. असे म्हटल्या जाते की, एका स्त्री मध्ये संपूर्ण जग सामावलेले असते, संपूर्ण जगाला दृष्टी देण्याची व प्रगतीपथावर नेण्याचे अनमोल कार्य एक स्त्री करत असते. आपल्या देशात सोशल मिडियाच्या माध्यमातून, विविध व्याख्यानांच्या माध्यमातून अनेक स्त्री विचारवादी आपल्या भावना व्यक्त करताना दिसतात. स्त्री ही पुरूषाच्या खाद्यांला खाद्या लावून आपली जबाबदारी पार पाडत असते, प्रत्येक क्षेत्रात ती यशस्वीरित्या कार्य करते, ती स्वतंत्र आहे वगैरे वगैरे. पण वास्तवात मात्र नारीवाद्यांचे हे सर्व विचार भावनाशुन्य होताना दिसतात जेव्हा ही स्वतंत्र समजल्या जाणारी स्त्री बलात्काराला, शोषणाला बळी पडते. नेहमी स्त्रीच बलात्काराला व शोषणाला बळी का पडते?

लहान पणापासूनच मुलींना पुरूषाच्या मदतीची गरज भासवल्या जाते. लहानपणी वडील, भाऊ, लग्नानंतर पतीच्या आधाराने जगणारी ही स्त्री पतीच्या निधनानंतर स्वत:ला निराधार व असुरक्षित समजायला लागते व याच असुरक्षिततेच्या भीतीपोटी अन्यायाला अत्याचाराला बळी पडते. पतीनिधनानंतर जेव्हा समाज स्त्रीला ‘‘विधवा’’ हे विशेषण लावतो त्यावेळी ती स्त्री मनो-सामाजिकरित्या खचून जाते. कारण विधवा हा एक शब्द नसून तो एक घाव आहे. ज्याची खपली ही प्रत्येक धार्मिक कार्याच्या वेळी निघत असते. समाजात तिला मिळणारी ही दुय्यम दर्जाची वागणूकच तिला कमकूवत बनवते व ती स्वत:ला असुरक्षित समजायला लागते. ही निराधार व असूरक्षित समजण्याची मानसिकता शिक्षित व अशिक्षित स्त्रियांमध्ये जवळपास सारख्याच प्रमाणात दिसून येते. भारतातील सतीप्रथा बंद झाली पण स्त्रियांवरील अत्याचार मात्र बंद झाले नाही. फक्त त्याचे स्वरूप मात्र बदललेले आहे. आजही समाजात विधवांची जी सद्यस्थिती आहे, जीवन जगताना त्यांना अपमानाच्या ज्या आगीत होरपळावे लागत आहे त्यापेक्षा सतीच्या कुंडातल्या आगीचे चटके कमी होते. जे फक्त एकदाच बसत होते. विधवा होवून रोजच्या मरणापेक्षा चितेवर सती जावून एकदाच मरण कितीतरी पटीने चांगल होत अशी विधवांची व्यथा आहे.

विधवा स्त्रीला समाजामध्ये वावरताना तिच्या राहणीमानापासून तर तिच्या छोटया छोटया हालचालीपर्यंत अनेक प्रकारची बंधन घालण्यात येते. एकीकडे जो समाज तिच्या सन्मानाबद्दल, सहनशीलतेबद्दल, कार्याबद्दल कौतुक करीत असतो तो समाज दुसरीकडे तिच्या अपमानाचे व शोषणाचे कारणही बनताना दिसते.

समाजात विधवेच्या या वाईट परिस्थितीमध्ये बदल करण्याची नितांत गरज आहे. आणि प्रत्येकानी ही सुरूवात स्वत:पासून सुरू करायला पाहिजे. कारण समाज हा संबंधाचे जाळे आहे. आणि याचा पाया व्यक्ती आहे. ज्या दिवशी प्रत्येक व्यक्ती ही स्त्रियांच्या सन्मानाबद्दल प्रत्यक्षरित्या व वैचारीक रूपात विचार करून त्याप्रमाणे आचरण करायला लागेल त्यादिवशी समाजातील प्रत्येक विधवा स्त्री ही स्वत:ला सुरक्षित व आत्मनिर्भर समजायला लागेल.

प्रस्तुत संशोधन लेखातून समाजातील विधवा महिलांच्या समस्यांचा आढावा घेणे, कुटूंबात आणि समाजात त्यांच्याशी होणारा अनुभव, विधवा स्त्रियांना सासरी, माहेरी मिळणारी वागणूक त्यांच्या मुलांचे प्रश्न, त्यांची होणारी मानसिक, शारीरिक हेळसांड याकडे समाजाचे लक्ष वेधणे हे प्रमुख उद्देश आहे.

**बीजसंज्ञा :-** विधवा स्त्रिया, समाज, समस्या.

## प्रस्तावना :-

‘‘यत्र नार्यस्तु पूज्यते रमन्ते तत्र देवता’’ असे सांगणारी आपली भारतीय संस्कृती ही आज ‘‘स्त्री जन्मा तुझी कहाणी हृदयी पान्हा नयनी पाणी’’ अशा केविलवाण्या परिस्थितीत आल्या आहेत. त्यातही स्त्री ही विधवा असेल तर तिचे जगणे हे क्लेशदायक व नरयकयातनेप्क्षा भयानक होवून जाते. विधवा स्त्रियांना मान, सन्मान, आपलेपणाची वागणूक मिळणे तर दूरच पण वेळोवेळी

त्यांना अपमानास्पद वागणूक दिली जाते, आणि त्यांना ही वागणूक जर कोणाकडून मिळत असेल तर ते आहे त्यांचे स्वत:चे कुटूंब आणि त्यांचा स्वत:चा समाज.

**विधवेशी मानावे अभद्र । मुलगी जन्मत: दळभद्र**

**वय वाढता समजावी क्षुद्र । हा तो दूष्टपणा समाजाचा'' ग्रामगीता**

आजही आपला समाज धार्मिक परंपरेच्या शृखंलेने जखडल्या गेला आहे. म्हणूनच त्यांचा विधवेकडे पाहण्याचा दृष्टिकोनही हा दुषितच व बुरसटलेलाच आहे.

२०२१ च्या पाहणीनुसार फक्त भारतात ५० लाखाच्या वर विधवा आहे. त्यातल्या त्यात फक्त १६,००० विधवा या उत्तरप्रदेशच्या वृदावन मध्ये राहणाऱ्या आहेत. त्यातच कोरोनाची भर पडली आणि विधवांच्या संख्येत वाढझाली. कोरोना एकल पुर्नवसन समितीच्या पाहणीनुसार एकटया महाराष्ट्रात ७०,००० कोरोना विधवा आहेत. त्यातही २०,००० विधवा या पन्नास वर्षापेक्षा कमी वयाच्या आहेत.

आजपर्यंत आपल्या देशात शेतकरी विधवा, सैनिकी विधवा, एड्स विधवा, वृंदावनातील विधवा, पश्चिम बंगालच्या वाघ विधवा, कश्मिरच्या अर्धविधवा आणि वर्तमानातील नव्याने भर पडलेल्या कोविड विधवा आदिंची विधवा यादी आहे.

**संशोधनाची उद्दिदष्टे**

१. समाजामधील विधवा स्त्रियांचे स्थान अभ्यासणे.

२. समाजामधील विधवा स्त्रियांच्या समस्या जाणवून घेणे.

**संशोधन पध्दती :**

प्रस्तुत शोधपत्रामध्ये आकडयांचे संकलन करण्यासाठी प्राथमिक स्त्रोतामध्ये केस स्टडी, मुलाखत, अनुसूची प्रश्नावलीचा अवलंब करण्यात आला. दुय्यम स्त्रोतांमध्ये संशोधन विषयाशी संबंधित प्रकशित, अप्रकाशित लिखाण, संदर्भग्रंथ, नियतकालिके, मासिके, साप्ताहिके, वर्तमानपत्रे, इंटरनेट आदिंचा वापर करण्यात आला आहे.

**विधवा परिभाषा व व्याख्या :**

समाजातील विधवा स्त्रियांचे समाजातील स्थान व त्यांच्या समस्यांचा आढावा घेत असतांना सर्वप्रथम विधवा महिला कोणाला म्हणावे हे जाणून घ्यायला हवे.

**विधवा** :जिच्या पतीचे निधन झाले आहे व जिने पुन्हा लग्न केले नाही अशा स्त्रीला विधवा म्हणतात.

**शेतकरी विधवा** :ज्या शेतकऱ्यांने कर्जबाजारी होवून आत्महत्या केल्या त्यांच्या पत्नीला शेतकरी विधवा म्हणतात.

**सैनिक विधवा** :देशासाठी लढणाऱ्या ज्या सैनिकांना विर मरण आले. त्यांच्या पत्नीला सैनिक विधवा असे म्हणतात.

**वाघ विधवा** :पश्चिम बंगालमधील सुंदरवनच्या जंगलात वाघाने मारलेल्या मजुरांच्या पत्नीला वाघ विधवा म्हणतात.

**अर्ध विधवा** :कश्मिरच्या हल्ल्यात गायप झालेल्या व जिवंत आहे की मृत्यू झाला आहे याचा अंदाजही नसणाऱ्या पुरूषांच्या पत्नीला अर्ध विधवा असे म्हणतात.

**वृंदावन विधवा** :विधवांच वास्तव्य कुटूंबात नको म्हणून वृदांवनच्या कृष्ण मंदिरात सोडून देणाऱ्या विधवांना वृंदावन विधवा असे म्हणतात.

**कोविड विधवा** :कोविडमुळे ज्यांचे पतीचे निधन झाले त्यांच्या पत्नीला कोविड विधवा असे म्हणतात.

**समाजामध्ये विधवांचे स्थान :**

आपल्या देशात एखाद्या व्यक्तीचा स्तर हा त्यांच्या सामाजिक-कौटुंबिक व्यवहारावर ठरत असतो तर एखाद्या स्त्रीचा सामाजिक दर्जा हा तिच्या वैवाहिक दर्जानुसार ठरत असतो. तिच्या वैवाहिक दर्जानुसार तिला तिच्या कुटूंबात, समाजात मान व दर्जा मिळतो. या सामाजिक दर्जानुसारच तिला समाजात वागणूक मिळते. आपले देशात साक्षरतेचे प्रमाण जरी वाढले असले तरीही जुन्या अनिष्ट रूढी, प्रथा, परंपरा अजूनही काही प्रमाणात तशाच सुरू असलेल्या दिसून येतात. त्यातलीच एक अनिष्ट प्रथा म्हणजे विधवांवरील अलिखित असलेले बंधन. पतीच्या निधनानंतर त्याच्या पत्नीच्या कपाळावरचे कुंकू मिटविणे, हातातल्या बांगडया फोडणे, गळयातले मंगळसुत्र तोडून टाकणे, पायातले जोडवे काढून टाकणे, तिचा पदर उतरविणे, तिला हिरवा रंग वापरायला मनाई करणे, धार्मिक शुभ कार्यात त्यांचा सहभाग नाकारणे, सामाजिक कार्यात दुय्यम स्थान देणे त्यांचा पांढऱ्या कपाळाची, नवऱ्याला मारणारी, करंटी, अवदसा, अशुभ आदि नावाने उल्लेख करणे. रोजच्या या मरणप्राय आगीत होरपळत जगण्यापेक्षा एकदाचे आगीचे चटके सोसून पतीसोबत सती गेलेल केव्हाही चांगले अशी व्यथा विधवा स्त्रिया व्यक्त करतांना दिसतात. विधवा हा शब्द जेव्हा मनातल्या मनात उच्चारतो तेव्हा एकाच वेळी असंख्य इंगळयाचा डंख झाल्याचा भयानक अनुभव येतो. कारण विधवा हा एक सहज शब्द नसून तो एक घाव आहे. ज्याची खपली ही प्रत्येक सामाजिक, धार्मिक, शुभ कार्याच्या वेळी निघत असते आणि तो घाव वाहत असतो. विधवा या शब्दाच्या डागण्या त्या स्त्रियांना माहिती आहे. ज्या विधवा आहे.

आपल्याच नाही तर बहुतांश देशात विधवाची स्त्री ही क्लेशदायीच आहे. त्यांना मिळणारी वागणूक ही भेदभावाचीच आहे. जगाच्या पाठीवरील प्रत्येक विधवेला कौटुंबिक, आर्थिक, भावनिक, मानसिक, सामाजिक आदि पातळयांवर क्लेशदायी संघर्ष करावा लागत आहे. आणि या संघर्षातून शहरी, ग्रामीण, नोकरी करणारी, शेतकरी विधवा, कोरोना विधवा कोणीही सुटलेले नाही. विधवा कुटूंबात असणे म्हणजे अशूभ असे मानण्याची पारंपारीक मानसिकताच कारणभूत आहे. विधवांच्या या दयनीय

परिस्थितीमध्ये सकारात्मक बदल व्हावा या एकमेव उद्देशाने प्रेरित होवून संयूक्त राष्ट्रसंघाने २०११ पासून २३ जुन हा दिवस ''अंतरराष्ट्रीय विधवा दिवस'' म्हणून घोषित केला आहे.

**विधवा स्त्रियांचे प्रमाण :**

एकटया भारतात जवळपास ४० लाखाच्या वर विधवा स्त्रीया आहेत. त्यातही गेल्या चार वर्षाच्या पाहणीनुसार १५,००० च्या वर विधवा या उत्तर प्रदेशामध्ये वृंदावनच्या रस्त्यावर राहत आहे. कोरोना महामारीच्या काळात जवळपास ७०,००० कोरोना विधवा या एकटया महाराष्ट्रात आहे. त्यातही २०,००० विधवा या ५० वर्षाच्या खालील वयोगटाच्या आहेत.

**मानवी हक्क आणि विधवा स्त्रिया :**

विधवा स्त्रियांना त्यांच्या वैधव्याच्या काळात अनेक समस्यांना तोंड द्यावे लागतात. त्यामध्ये समाजाचा त्यांच्याकडे पाहण्याचा बुरसटलेल, हिन दर्जाचा दृष्टिकोन, अशुभ मानणे, अंधश्रध्दा, लैगिक शोषण, मिळणारी वाईट वागणूक, शारीरिक, मानसिक छळ इत्यादि समस्यांना सामोरे जावे लागते. त्यातही त्यांच्यात केला जाणारा भेदभाव आणि मानवी हक्क आयोगाने त्यांच्याकडे केलेले दूर्लक्ष या सगळया गोष्टींमुळे विधवाना या सगळया समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. आजही अनेक विधवा महिलांना त्यांच्या मुलभूत व मानवी हक्कासाठी, त्यांच्या जीवनावश्यक सुविधासाठी आणि समाजात मान-सन्मानाने जगण्यासाठी जीवघेणा, केविलवाणा संघर्ष करावा लागत आहे. दारिद्रयाने ग्रासलेल्या असल्याने अनेक विधवा पौष्टिक आहारसुध्दा घेवू शकत नाही. यातूनच त्यांच्या आरोग्याच्या समस्या निर्माण होतात. यातही भारतातील अनेक विधवांना राहण्याची सोय नसल्याने त्या उघडयावर, रस्त्यावर राहतात या ठिकाणी त्या स्वत:च्या शरीराची स्वच्छता राखू शकत नाही व त्याचा परिणाम म्हणजे त्यांना अनेक आजारांना सामोरे जावे लागते.

**विधवा स्त्रियांच्या समस्या :**

विधवांच्या प्रती समाजाच्या या दुषित दृष्टिकोनामुळे विधवांना जीवन जगतांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते. कधी कधी हा संघर्ष सहन न झाल्याने त्या आत्महत्येसारखा घातक निर्णयसुध्दा घेतात.

**विधवांच्या कौटूंबिक समस्या :**

पतीचे निधन होण्याचा पुर्ण दोष कुटूंब त्या स्त्रीच्या माथी मारण्याचा प्रयत्न करतात त्यामुळेच त्या स्त्रीला अशुभ, अपशकुनी समजल्या जाते आणि याच दृष्टिकोनामुळे तिला कुटूंबामध्ये धार्मिक शुभ कार्यात सहभागी होवू दिले जात नाही.

**विधवांच्या सामाजिक समस्या :**

कुटूंबानंतर विधवा स्त्रीला समाजाच्या अलिखित बंधनाना सामोरे जावे लागते. तिला सामाजिक कार्यामध्ये सहभागी होण्यासाठी विरोध केला जातो. सामाजिक कार्यक्रमामध्ये विधवा स्त्रीयांसोबत भेदभाव

केला जातो. विधवा स्त्रीचे तोंड पाहणे सुध्दा अपशकुन मानल्या जाते.

**विधवाच्या आर्थिक समस्या :**

घरातील कमावत्या व्यक्तीचे निधन झाल्यामुळे समाजातील आर्थिक धुरा ही त्या व्यक्तीच्या विधवेवर येवून पडते. आणि तिला आर्थिक अडचणींना तोंड द्यावे लागते. यातूनच तिला सासरी व माहेरी संपत्तीतून बेदखल केल्या जाते. कधी कधी तिला घरातूनही बाहेर काढल्या जाते. त्यातच तिच्या मुलांचे प्रश्न तिलाही भेडसावत असतात अशा वेळी ती स्वत:ला लाचार व असुरक्षित समजायला लागते.

**विधवांच्या भावनिक समस्या :**

पतीच निधन झाल्यानंतर आधीच ती मनाने खचून गेलेली असते. त्यातच मिळणारा एकटेपणा, कुटूंबातील लोकांकडून मिळणारी उपेक्षा यामुळे ती खचून गेलेली असते. तिला तिच्या भावना व्यक्त करायला कोणाचा आधार नसतो. व ती उदासीन होते आतल्या आत ती घुसमटत जाते व एकलकोंडी बनायला लागते. तिचा लोकांशी संपर्क कमी होत जातो व ती पुर्णपणे एकटी पडते.

**विधवांचा मानसिक ताण–तणाव :**

जोडीदाराचे निधन झाल्याचा मानसिक धक्का त्या स्त्रीला बसतो व ती मानसिक ताण–तणावामध्ये जाते यातूनच तिला मानसिक उदासीनता यायला लागते व ती नकारात्मक विचार करायला लागते. स्वत:शीच बोलायला लागते, शुन्यात बघायला लागते व दिवसेंदिवस निराशेच्या गर्तेत जावून शेवटी आत्महत्येसारखा घातक निर्णय घेते. विधवा झाल्याने तिला जीवनामध्ये स्वारस्य राहत नाही. तिला अन्न गोड लागत नाही. ती फक्त मुलांसाठी जगत असते. पतीच्या निधनाचा आघात तिच्या मनावर झालेला असतो.

**निष्कर्ष :**

प्रस्तुत अध्ययनातून असे स्पष्ट होते की, आजही समाजामध्ये विधवा महिलांचे स्थान हे खालच्या दर्जाचेच आहे. त्यांना कुटूंबामध्ये, समाजामध्ये योग्य तो मान–सन्मान दिल्या जात नाही. आजही प्रगतीशील समजल्या जाणाऱ्या आपल्या देशात विधवा महिलांना उपेक्षित व तिरस्कारपुर्ण वागणूकीला सामोरे जावे लागते. त्यांना यत्र नार्यस्तु पुज्यते, विद्या गुरूहून थोर, नररत्नाची खाण वगैरे काही समजल्या जात नसून उलट त्यांना अशुभ, अपशकुनी असेच मानल्या जाते. विधवा महिलांसोबत कुटूंबात, समाजात दुर्व्यवहार केला जातो. आपल्या समाजावर धार्मिक परंपरेचा जबरदस्त पगडा असल्याने आजही समाज विधवेकडे तुच्छतेनेच बघत असतो. आजही समाजामध्ये शुभ, अशूभ, अंधश्रध्दा असल्याने विधवांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. अजूनही विधवांना त्यांच्या मुलभूत हक्कासाठी, मानवी अधिकारासाठी अस्तित्वासाठी, मान–सन्मानासाठी स्वाभिमानाने जीवन जगण्यासाठी क्लेषदायी

संघर्ष करावा लागत आहे. यासोबतच अनेक विधवांना कुटूंबात, समाजात, लैंगिक शोषण, इच्छेविरूध्द पुर्नविवाह, मुलांची चिंता यासारख्या संकटांना सामोरे जावे लागत आहे. आता तर कोरोन महामारीमुळे विधवांची स्थिती अधिकच भयानक झालेली आहे. विधवांच्या संख्येत होणाऱ्या वाढीसोबतच त्यांना विस्थापनाची समस्यासुध्दा भेडसावत आहेत. नविन जागेवर विस्थापन झाल्याने त्या नविन जागेतील नव-नविन समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. पतीच निधन, तरूण वय कोणाची सोबत नसणे, मुलांची जबाबदारी, समाजात असुरक्षित वाटणे, कायद्याचेही संरक्षण नसणे, समाजाचा दूषित दृष्टिकोन या साऱ्या अडचणींमुळे या विधवांमध्ये मानसिक उदासनिता निर्माण होवून त्या अनेकदा मुलांसोबत आत्महत्या करतांना दिसतात.

प्रस्तुत अध्ययनातून असे लक्षात येते की, पुरूषप्रधान असलेल्या आपल्या संस्कृतीत आजही विधवा स्त्रियांचे प्रश्न, समस्या या चिंताजनकच आहेत. त्यातही कोरोना महामारीने विधवा झालेल्या स्त्रिया आजही समाजातील पुरूष व्यवस्थेशी लढा द्यावा लागतो ही सुध्दा चिंतेची बाब आहे. त्यांना त्यांच्या कौंटुंबिक, सामाजिक, भावनिक, लैंगिक समस्यांना तोंड देत असतांना सोबतच त्यांना शारीरिक, मानसिक आरोग्य, मुलांचे प्रश्न आदि प्रश्नांशी संघर्ष करावा लागतो व त्यांना मन मारून जगावे लागते. हेच आज समाजातील विधवा स्त्रीयांच्या जीवनाचे वास्तव आहे. कोरोनामुळे विधवांची जीवन अजूनच वेदनादायी, क्लेशदायी व अंधकारमय झालेले दिसून येते आणि या सगळया गोष्टींचा परिणाम त्यांच्या कौंटुबिक व सामाजिक संबंधावर होतांना दिसून येतो.

**संदर्भ सूची :**

वंदनिय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, ग्रामगीता, अध्याय २०, ओवी ९४.

खडसे भा. कि. (२००४), भारतीय समाज आणि सामाजिक समस्या, हिमालय पब्लिशिंग हाऊस, मुंबई, प्र.क्र. १४६.

V.V. Sonawane, Suresh Bhalerao (Ed) (2014), Womens and Human Rights, Prashant Publications, Jalgaon, Page No. 172.

लोकमत न्यूज नेटवर्क, Published : Sun 22, 2021.

https://www.mymahanagar.com

रेणुका कड, June 22 : 2021 प्रश्न कोविड विधवांचे.

https://www.mygov.in/covid - 19

www.google.com